जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 17-01-2020

तरुण भारत

# कबीरपंथी भजनाने विद्यापीठ परिसर नादमय

## आष्टा व दुधगाव येथील भजनी मंडळाच्या कलाकारांनी केले सादरीकरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

"खेती करो हरी नाम की मनवा, खेती करो हरी नाम की। पईसा ना लागे रुपिया ना लागे, कवडी न लागे फुटकी।। मन के बैल सुरत पोहावे, रसि लगाऊँ गुरू ग्यान की। कहत कबीरा सुन भाई साधु, भक्ति करो हरीहर की।।" यासारख्या कबीराच्या दोह्यांनी शिवाजी विद्यापीठाचा परिसर नादमय होऊन गेला.

विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फेसुरू असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रासमोरील हिरवळीवर आष्टा येथील कबीरपंथी भजनी मंडळाच्या भजनाच्या कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

### लुप्त होत असलेला कलाप्रकार सादर केल्याचा आनंद

कबीर आणि तुकाराम यांचा काळ वेगळा असला तरी त्यांची भाषा, वेदना आणि संवेदना एकच आहेत. त्यांनी भजन किर्तनाच्या माध्यमातून सर्वसामान्याच्या वेदना मांडल्या. महाराष्ट्रामध्ये कबीराचे दोहे पारंपरिक पद्धतीने जपले गेले आहेत. त्यांना शिवाजी विद्यापीठाच्या व्यासपीठावरुन सादर करताना अत्यंत आनंद होतो आहे. भारतीय लोककलेचा हा एक लुप्त होत चाललेला कलाप्रकार सादर करणाऱ्या कलावंतांचे कौतुक व अभिनंदन केले. कुलगुरू डॉ. शिंदे यावेळी म्हणाले,

- कबीर, तुकारामांच्या भाषा, संवेदना एकच
- विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे आयोजन

यावेळी आष्टा येथील नवनाथ भजनी मंडळाच्या विष्णू आबा थोरात, नारायण गाडगे, भारती मस्के, अजय गस्ती, विजय दतू टोमके यांनी तर दुधगाव येथील कबीरपंथी भजनी मंडळाच्या अविनाश कुदळे, भरमू भाऊ गाजी, कृष्णा आंबी, शिवाजी गवळी, मारुती गवळी, धोंडीराम सपकाळ या कलाकारांनी कबीरपंथी तसेच वारकरी संप्रदायातील भजनांचे सादरीकरण केले.



कबीरपंथी भजनी मंडळाच्या भजनाच्या या कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. वैभव ढेरे, डॉ. पी. बी. बिलावर आदी उपस्थित होते.

# खेती करो हरिनाम की मनवा...

## कबीरपंथी भजनांचे सादरीकरण : शिवाजी विद्यापीठाचा परिसर नादमय



शिवाजी विद्यापीठात बुधवारी आष्टा आणि दुधगाव (जि. सांगली) येथील भजनी मंडळांनी कबीरपंथी भजन सादर केले.

**कोल्हापूर :** ‘खेती करो हरिनाम की मनवा, खेती करो हरिनाम की... पईसा ना लागे, रुपिया ना लागे, कवडी न लागे फुटकी. मन के बैल सुरत पोहावे, रसि लगाऊँ गुरु ग्यान की.... कहत कबीरा सुन भाई साधु, भक्ति करो हरिहर की...’ या संत कबीर यांच्या दोह्यांनी शिवाजी विद्यापीठाचा परिसर बुधवारी नादमय झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत बुधवारी सकाळी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील हिरवळीवर आष्टा येथील कबीरपंथी भजनी मंडळाने कार्यक्रम सादर केला. त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. आष्टा येथील नवनाथ भजनी मंडळाच्या विष्णू आबा थोरात, नारायण गाडगे, भारती मस्के, अजय गस्ती, विजय दत्तू टोमके यांनी; तर दुधगाव येथील कबीरपंथी भजनी मंडळाच्या अविनाश कुदळे, भरमू भाऊ गाजी, कृष्णा आंबी, शिवाजी गवळी, मारुती गवळी, धोंडीराम सपकाळ या कलाकारांनी कबीरपंथी आणि वारकरी संप्रदायातील भजनांचे सादरीकरण केले. यावेळी कुलसचिव डॉ. बिलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत, डॉ रणधीर शिंदे, डॉ. सुनीलकुमार लव उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिं वैभव ढेरे, पी. बी. बिलावर, डॉ नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

**भाषा, संवेदना एकच :** कबीर आणि तुकाराम यांचा काळ वेगळा असला तरी त्यांची भाषा, वेदना आणि संवेदना एकच आहे. ते दोघेही सर्वसामान्यांची भाषा बोलतात आणि सर्वसामान्यांसाठी आवाज उठवितात. त्यामुळे त्यांच्याशी आपण पटकन जोडले जातो. या दोघांचे हे वैशिष्ट्य व्यक्तिगतरीत्या मला खूप भावते. महाराष्ट्रामध्ये कबीरांचे दोहे पारंपरिक पद्धतीने जपले गेले आहेत, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

# ‘खेती करो हरी नाम की...’

## संत कबीर यांच्या दोह्यांनी शिवाजी विद्यापीठ परिसर भक्तिमय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

‘खेती करो हरी नाम की मनवा, खेती करो हरी नाम की। पईसा ना लागे रुपिया ना लागे, कवडी न लागे फुटकी।। मन के बैल सुरत पोहावे, रसि लगाऊँ गुरू ग्यान की। कहत कबीरा सुन भाई साधु, भक्ति करो हरीहर की।।’ या आणि यासारख्या संत कबीरांच्या दोह्यांनी आज शिवाजी विद्यापीठाचा परिसर भक्तिमय होऊन गेला. भक्ती करण्यासाठी धनाची आवश्यकताच नसते आणि भक्तीमुळे मनाची संपदा सुदृढ होते, असा संदेश यावेळी उपस्थितांना देण्यात आला.

मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील हिरवळीवर कबीरपंथी भजनाचा कार्यक्रम पार पडला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी केंद्रीय सांस्कृतिक संचालनालयाच्या समितीचे सदस्य उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे संत कबीर यांच्या दोह्यांचे सादरीकरण करताना आष्टा व दुधगाव येथील भजनी मंडळाचे कलाकार.**

भारती म्हस्के यांनी संत मीराबाईंचे भजन सादर करताना सध्याच्या जीवनात त्यागाची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, महाराष्ट्रामध्ये संत कबीरांचे दोहे पारंपरिक पद्धतीने जपले गेले आहेत. त्यांना आज शिवाजी विद्यापीठाच्या व्यासपीठावरून सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. मराठी अधिविभागातील डॉ. नंदकुमार मोरे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. वैभव ढेरे, डॉ. पी. बी. बिलावर आदी उपस्थित होते.

# डॉ. म. सु. पाटील पुरस्काराचे आज शिवाजी विद्यापीठात वितरण

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ.म.सु.पाटील यांच्या नावे देण्यात येणारा पहिला समीक्षा पुरस्कार डॉ. सुधीर रसाळ (औरंगाबाद) यांना शुक्रवार (दि.१७) रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात प्रदान करण्यात येणार आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉ. रसाळ यांना ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते दिला जाणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के असणार आहेत. याप्रसंगी ज्येष्ठ लेखक डॉ. राजन गवस, कवयित्री नीरजा उपस्थित राहणार आहेत.

# म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार वितरण आज

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

कला साहित्य संस्कृती

मराठी समीक्षा क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या समीक्षकांसाठी दिला जाणारा 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ लेखक, कवी व ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण शुक्रवारी (ता. १७) होणार आहे.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. याप्रसंगी ज्येष्ठ लेखक राजन गवस व कवयित्री नीरजा उपस्थित राहणार आहेत.

सुधीर रसाळ मराठीतील नामवंत व साक्षेपी समीक्षक आहेत. अर्ध शतकाहून अधिक काळ ते समीक्षा लिहीत आहेत. त्यांचे आठ समीक्षाग्रंथ प्रकाशित झाले असून, व्यक्तिचित्रणात्मक लेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत. काव्यसमीक्षक अशी त्यांची ओळख असून त्यांनी मराठीत मूलभूत स्वरूपाचा समीक्षा विचार मांडला. पुरस्कार वितरण समारंभ शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये (सिनेट हॉल) शुक्रवारी दुपारी चार वाजता होणार आहे. समारंभास साहित्यप्रेमी, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.